# SPARK
Rotary Club of Poona Midtown

Rotary

CREATE HOPE in the WORLD



**Rtn. Minal Avachat**
President
9823081158

**Rtn. Smita Shah**
Secretary
9049860647

**Ann Manisha Kulkarni**
Editor
9422307038



Dist 3131 | Zone 05 | CC 15537
Year : 54 | Issue No.: 32 | Wed, 27 March 2024
For Private Circulation Only

We meet at Sevasadan School, Erandavane, at 7.30pm every Wednesday


**|| जलमेव जीवनम् ||**

## आजची सभा : कलाकार कट्टा


आज या वर्षातील तिसरा कलाकार कट्टा कार्यक्रम होत आहे. दुष्यंत वाघ आणि प्रतिमा कुलकर्णी यांच्याशी रो. कपिल जोशी गप्पा मारत त्यांचा कलाक्षेत्रातील प्रवास उलगडून दाखवतिल.



### प्रतिमा कुलकर्णी

गेली जवळपास ४ दशके लेखक दिग्दर्शक आणि अभिनय या त्रिगुण संपन्न असलेल्या प्रतिमा ताई आपल्या सर्वांना ज्ञात आहेत. मुंबई मध्ये जन्म झाला आणि रंगमंच ते कॅमेरा असा त्यांचा प्रवास खूप मोठा आहे तसा अनुभव देखील दांडगा आहे. आत्तापर्यंत हिंदी मराठी आणि कोकणी ह्या स्थानिक भाषांमध्ये त्यांनी काम केले आहे. आत्तापर्यंत २० च्या आसपास हिंदी मराठी इंग्लिश नाटकाचं दिग्दर्शन, 'School आणि Salam Bacche' या बालचित्रपटांचे लेखन- दिग्दर्शन, हिंदी मराठी टेलिव्हिजन वरील मालिकांचे लेखन-दिग्दर्शन आणि अभिनय, त्याच बरोबर मुंबई पुणे आणि सिंगापूर येथे अभिनय प्रशिक्षण शिबिरे असे अनेक टप्पे प्रतिमा ताईंनी अविरत पार केले आहेत. महाराष्ट्र आणि गोवा सरकार कडून 'सावली' या त्यांच्या चित्रपटाला पटकथा - संवाद यासाठी पुरस्कार मिळाला आहे. सध्या स्टार प्रवाह सुरु असलेल्या 'मुरांबा' या मालिकेत मध्यवर्ती भूमिकेत कार्यरत आहे. अशा या वरिष्ठ आणि सर्वगुणसंपन्न कलाकाराला वंदन करून क्लब कडून त्यांचे स्वागत करूया.

---



### दुष्यंत वाघ

परमेश्वर बहुधा काहींना अभिनयच करायचा असं म्हणतो आणि पृथ्वीवर पाठवतो. मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्क इथे गेलेले बालपण, बालमोहनचा मी असा अभिमान आणि रुपारेल कॉलेजचा प्रसिद्ध कट्टा! माफ करा नाका म्हणायला हवा यातून घडलेला कलाकार म्हणजे दुष्यंत वाघ...! वयाच्या १३ व्या वर्षी महेश मांजरेकर दिग्दर्शित 'तेरा मेरा साथ रहे' पासून अभिनयाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि पुढे हा अभिनयाचा प्रवास सुरूच राहिला. तेव्हा असलेला अल्फा टिव्ही मराठी म्हणजेच आताचं झी मराठी मधील शो 'दे धमाल', स्टार प्रवाह वरील मन उधाण वाऱ्याचे' यात त्याने काम केले आहे. गजेंद्र अहिरे - माय बाप, निशिकांत कामत - डोंबिवली फास्ट, ते अगदी आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'पानिपत' मधील नाना फडणवीस यांची भूमिका या आणि अनेक भूमिका दिग्गज दिग्दर्शकांच्या मार्गदर्शनाने या कलाकाराने पेलल्या आहेत.

प्रतिमाताई दिग्दर्शित 'School' चित्रपटात देखील त्याने काम केलं आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांची साकारलेली 'महाराष्ट्र शाहीर' मधील भूमिका ते राज कुमार हिरानी दिग्दर्शित '3 Idoits' मधील भूमिका याने या गुणी कलाकाराला प्रकाश झोतात आणले हे नक्की. नुकताच प्रदर्शित झालेला 'शिष्यवृत्ती' चित्रपट आणि कलर्स मराठी वरील 'कस्तुरी' मालिका ह्यातून तो झळकला आहे. लहानपणापासून अभिनय क्षेत्राला वाहून घेतलेल्या आणि मिलिमीटर कामापासून ते सेंटिमीटर नाही तर अनेक किलोमीटरचा प्रवास पूर्ण केलेल्या दुष्यंत वाघ यांचे क्लब कडून मनापासून आम्ही स्वागत करतो.

## Handover of E-Learning Kit at Vidya Vikas School



**Successful Handover of E-learning Kit and Conclusion of Year-round Soft Skills Programme at Vidya Vikas School.**

I am delighted to share the success of the recent events organized by the Rotary Club of Poona Midtown at Vidya Vikas School in Aranyeshwar.

On Wednesday, March 27th, 2024, our club organised a memorable handover ceremony for an E-learning kit, a vital component of our TEACH program aimed at enhancing basic education and literacy. The event was graced by the presence of dedicated Rotarians and their spouses who wholeheartedly support our mission of promoting education within the community.

During the ceremony from 8:30 am to 9:30 am, we officially presented the E-learning kit to the school, underscoring our commitment to fostering e-learning initiatives and providing essential resources for education in the digital era. This initiative reflects our unwavering dedication to addressing educational needs and promoting literacy within our community.

Moreover, the event provided a unique opportunity for attendees to witness firsthand the positive impact of our club's activities in the Basic Education and Literacy sector. It served as a platform for meaningful engagement between our members and the students, further reinforcing our collective efforts towards improving educational outcomes.

Additionally, I am pleased to announce the successful conclusion of the year-round soft skills program for 8th and 9th-grade students. It was heartwarming to receive expressions of gratitude from the students who benefitted from this program. Their appreciation further validates the importance and impact of such initiatives in nurturing well-rounded individuals within our society. I extend my sincere gratitude to all involved in making these initiatives a success, especially **President Rtn Minal, Service Project Director Rtn Sachin Deshpande.** Together, we are making a tangible difference in the lives of individuals and communities.

Thank you for your continued support and dedication.

**- Rtn. Sameer Mohire**
District Co-director Literacy Youth Director RCP Midtown

## मागील सभा




### AG Visit

बुधवार दि. २० मार्च रोजी AG सुनीता शिरगुप्पी यांनी आपल्या क्लबला व्हिजिट दिली. सुरवातीला प्रेसिडेंट मिनल अवचट यांनी AG व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर प्रेसिडेंट मिनल यांनी क्लबच्या कामाचा आढावा घेतला व पुढील नियोजन सांगितले. सेक्रेटरी स्मिता शहा यांनी सेक्रेटरीअल अनाऊन्समेंट्स केल्या. त्यानंतर सर्व बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व त्यांचे कमिटी चेअरमन यांनी त्यांचे सविस्तर रिपोर्ट सादर केले. त्यावर AG सुनीता शिरगुप्पी यांनी सर्व कामाचा आढावा घेऊन क्लबचे व बोर्ड मेंबर्सचे कौतुक केले. तसेच कामकाजाविषयी काही सजेशन्स दिल्या. PP राजकुमार तांबे यांनी AG सुनिता यांची ओळख करून दिली. तर PE अभिजित म्हसकर यांनी आभार मानले.

**– रो. सुरज पाषाणकर**
डायरेक्टर क्लब ॲडमिन

## अभिनंदन

- उद्यम विकास बँकेच्या संचालक पदी बिनविरोध नेमणूक झाल्याबद्दल रो. शैलेश टिळक यांचे हार्दिक अभिनंदन.

## जीवेत् शरदः शतम्

**२३ मार्च :** ॲन हिमानी जोशी

**२४ मार्च :** ॲन वीणा पाषाणकर

## आगामी कार्यक्रम

**3rd April : Programme by Rishabh group**
**10th April : DG Visit**
**17rd April : Bawarchi Day**




## रंगपंचमी

आपल्या आयुष्यातील रंगांचे सर्वस्पर्शी अस्तित्व आणि महत्व, शब्दांकित करण्याचा प्रयत्न.

**आपले रंग** लाल भडक, पिवळा धमक, गडद भगवा, गर्द जांभळा, हिरवागार, निळाशार, पांढराधोप नि काळाभोर जीवनाचे अंग अंग, खुलवणारे हे अनंत रंग.

**आपला तिरंगा** भगवा रंग शौर्याचा, पांढरा रंग शांततेचा, हिरवा रंग समृद्धीचा, तिरंगा झाला आपला, पंचाहत्तर वर्षांचा.

**आपला निसर्ग** अगणित रंग फुलापानांचे, रंगवी अदृश्य कुंचला, तोच नटवी आणि सजवी आसमंत आपला, एक हिरवा रंग पानांचा,त्याच्या छटा हजार, असा हा आपला निसर्ग, चित्रकार की जादूगार? आपल्या निसर्गाचे आपण करूया रक्षण, आणि वाचवूया आपले पर्यावरण.

**आपले डोळे** काळेभोर निष्पाप डोळे, घारे घारे लबाड डोळे, निळे निळे अथांग डोळे, हिरवे हिरवे गूढ डोळे. डोळ्यांचा रंग स्वभाव सांगतो म्हणे, किती खरे, किती खोटे, देवजाणे.

**आपला दिवस** धुरकट पहाट, शुभ्र पांढरी सकाळ, सोनेरी उन्हाची दुपार, किरमिजी संध्याकाळ, त्यानंतर देत थकल्या तनमनाला आधार, येते उबदार, रात्र काळीशार.

**आपलं ताट** सोनसळी भात, त्यावर पिवळे धमक वरण, पांढरी शुभ्र पोळी नि हिरवीगार चटणी, सोनेरी चौरंग आणि लालचुटुक पाट, असे असावे आपले रोजचे ताट.

**आपली वस्त्रे** घ्यावे सप्तरंग इंद्रधनूंचे आणि मखमली स्पर्श मयूरपंखांचे, वल्कलं, पटोळा आणि पैठण्या, रेशिमकांती आपली सजविण्या.

**आपले अलंकार** हिऱ्यांचा लखलखाट, चांदीचा चमचमाट, सोन्याचा कनकरंग आणि मोत्यांचा संग, झळाळतो तनुरंग,पाहुनी होती दंग.

**आपलं आयुष्य**
दुधासारखं निरागस शैशव, सोनेरी स्वप्नं पाहणारं यौवन, चांदण्यांसारखं धवल वार्धक्य, आयुष्य या तीन रंगांनी रंगले, तर आणखी काय हवे?

**आपली इच्छा**
रंगबिरंगी दुनिया हेच तर जगण्याचे कारण आहे, रंगविहीन दुनिया ही कल्पनाच असह्य आहे. आपल्यांच्या संगतीत आयुष्य व्हावे रंगीत, आणि साथीला असावे छानसं संगीत. हर तऱ्हेचे रंगाने रंगावे जीवनाचे हरएक अंग, दृष्ट न लागण्यापुरताच असावा थोडासा काळाही रंग.

अक्षय राहो तुमच्या आमच्या आयुष्यातली ही रंगांची उधळण आणि रंगाची पखरण, चला, रंगून जाऊन साजरा करू आपण सर्वजण.

संकलीत

## भक्ती म्हणजे

किती साधी सोपी सरळ व्याख्या आहे पहा... भक्ती जेव्हा अन्नात शिरते तेव्हा तिला प्रसाद म्हणतात आणि भक्ती जेव्हा भुकेत शिरते तेव्हा तिला उपवास असे म्हणतात. भक्ती जेव्हा पाण्यात शिरते तेव्हा तिला तीर्थ म्हणतात आणि भक्ती जेव्हा प्रवासाला निघते तेव्हा तिला यात्रा असे म्हणतात. भक्ती जर का संगीतात शिरली तर तिला भजन/कीर्तन म्हणतात आणि हीच भक्ती जर का लोकसंगीतात शिरली तर तिला भारूड असे म्हणतात. भक्ती जेव्हा माणसात प्रकटते तेव्हा माणुसकी निर्माण होते आणि हीच भक्ती जर घरात शिरली तर त्या घराचे मंदिर होते. भक्ती जर का शांतपणे मनाच्या गाभाऱ्यात शिरली तर त्याला ध्यान म्हणतात आणि भक्ती जर का कृतीत उतरली तर तिला सेवा असे म्हणतात...

-: Bulletin Committee :-

| Rtn Dr. Shubhada Jathar | Ann Sujata Keskar | Ann Seema Mhaskar | Ann Aarti Dengre | Rtn Rajeev Ghode |
|---|---|---|---|---|
| Chairman | Member | Member | Member | Member |